भाग ८

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

॥ श्री ॥

।। चिंतनक्षण ।।

भाग : ८

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* **चिंतनक्षण : भाग-८ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

प्रयत्नांची पराकाष्ठा, शरणागतीची
परिसीमा व भावांची परिपूर्णता
यांचा संतांकडे त्रिवेणीसंगम असतो,
म्हणून भाविक साध्या स्नानानेही
शांत-पवित्र होतो.२११

आपत्ती सर्वांना असतातच,पण त्यांचा त्रास न मानण्याची क्षमता आपल्यात असते,याची कल्पना मात्र सर्वांना असतेच असे नाही.२१२

आपल्या आरशाचा पारा उडाला नसला, तर आपल्या दुःखाचे कारण आपण स्वतः दिसतो, उडाला असला तर कारण जग दिसते.[२१३]

नाम पोटात ठेवून
प्रसंगाला सामोरे जावे.२१४

खऱ्या परमार्थाचे स्वरूप, कौशल्य
व थोडा अनुभव देऊ शकला तर
तो 'सत्संग' खरा,
बाकी परमार्थाच्या नावावर
स्नेहसंमेलन ! २१५

कर्म 'एक'च असले तरी
भावनेची कितीही अर्थपूर्ण
'शून्ये' त्याच्यापुढे ठेवता येतात
म्हणून तुळशीपत्रानेही भगवंत
वश होतो. २१६

आसक्ती कमी होत जाणे,
व्यवहारातील कुठलीच घटना स्वतः
संवेदनक्षम असूनही मनात खोलवर न
जाणे व साधनेचे सातत्य टिकून राहाणे
- या नाम बरोबर चालल्याच्या खुणा
आहेत.२१७

मनाला नावडणाऱ्या वस्तू
पुरवणे व आवडणाऱ्या
टाळणे हा प्रापंचिकांचा
सोपा योगमार्ग आहे.२१८

काहीच उच्च ध्येय नसेल
तर निदान देह सात्त्विक
कष्टांत तरी ठेवावा.२१९

आपत्तींपूर्वी असलेल्या व आपत्तींबरोबर आलेल्या गोष्टी पाहिल्या की, अनेकदा आपत्तींबद्दल तक्रार राहात नाही.२२०

उपक्रमांना अनेक पर्याय
असू शकतात,
उपासनेला नव्हे ! २२१

पैसा, सत्ता, रूप यांचा अहंकार
व्ययाने, क्षयाने, वयाने तरी
जाईल, पण सत्कर्मांचा अहंकार
जाणे कठीणच !२२२

मौनातदेखील ज्यांना
स्वतःशीसुद्धा न बोलता
राहाता येते ते खरे मौनी !२२३

चित्ताचे वय सांगता आले
नाही, तरी घटक सांगता
येतात आणि चित्ताचा
पालटही करता येतो.[२२४]

प्रपंचातल्या आपल्या सुखदुःखात
'साक्षीदार'खूप मिळतात, पण
सद्गुरूंसारखे 'प्रेमळ साथीदार'
मात्र कमीच भेटतात ! २२५

डोळ्यांना दिसते ते खरे नसू शकते हा जर आपला प्रपंचातला अनुभव आहे तर जे खरे आहे ते डोळ्यांना न दिसू शकते हे संतांचे म्हणणे समजून घेण्यात कोणती अडचण आहे ?२२६

प्रपंच करण्यासाठी
'इहा'ला पर्याय नाही,
तसाच आनंदासाठी
'परा'ला पर्याय नाही.२२७

‘इह’ समजून, सांभाळून,
पुरवून,संपवून मोकळे व्हावे
- मोडून, टाकून, टाळून,
पळून नको.२२८

संत हे आपली दृष्टी बदलण्यासाठी आहेत, सृष्टी बदलण्यासाठी नाहीत, दृष्टी बदलल्याने पुढे आपल्याच कर्माने सृष्टी बदलते.[२२९]

वस्तुस्थितीचा विसर पडणे
व विसर पडल्याची
जाणीवही न उरणे ही
माया.[२३०]

‘संचयात्मा’नुसता स्वतः दुःखात पडत नाही, तर इतरांनाही दुःखात टाकतो.२३१

संपर्कासाठी मोबाईलची दोरी गळ्यात अडकवणे आधुनिक व सुशिक्षित लोकांना अडचणीचे वाटत नसेल तर भक्ताला स्मरणासाठी गळ्यात माळ घालण्यात संकोचायचे काहीच कारण नाही.[२३२]

मृत्यूच्या विस्मरणात जीवन
जगणे म्हणजे अंधारात
ग्रंथवाचन करणे आहे.[२३३]

सावधतेने वर्तमानाची छिन्नीहातोडा
चालवणाऱ्याला भूतकाळाच्या
आठवणींच्या व भविष्यकाळाच्या
कल्पनांच्या सारखळ्या बांधू शकत
नाहीत व बाधूही शकत नाहीत.२३४

भूतकाळ कसाही असू दे,
पण आजच्या दुर्लभ, सुंदर
व आदर्श वर्तमानात मी तो
का जगावा ?२३५

काळाचा फरक पडला म्हणजे बाह्य प्रश्नांत फरक पडतो, आंतरिक प्रश्नांत नव्हे.[२३६]

प्रपंच ही अशी परीक्षा आहे जिच्यात उत्तीर्णांचे प्रमाणच मुळात फार थोडे असते.पण परीक्षेला बसणाऱ्या प्रत्येकाला मात्र मी पहिला आलो आहे असे वाटते.[२३७]

उपासना म्हणजे वेळेला सर्व
विधायक कामी उपयोगाला येणारी
शक्ती आहे, फक्त उपयोगाच्या
वेळी नि:स्वार्थी असावे लागते.२३८

ठेच लागल्याशिवाय
पायाखालचा रस्तासुद्धा न
पाहाणारा माणूस दुःखाची ठेच
लागल्याशिवाय संतमार्ग कुठला
पाहाणार ? २३९

कर्ता सावध असला
म्हणजे कर्मे उचित होतात
व क्रियापदेही बरोबर
चालतात.२४०

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *